| | | |
|---|---|---|
| | **मा. पोलीस अधीक्षक यांचे कार्यालय,**<br>**वजिराबाद चौक, नांदेड**<br>**ईमेल :-** sp.nanded@mahapolice.gov.in<br>pronanded@gmail.com | |

**Press Note** दिनांक -28.10.2025

## " अवैध शस्त्रसाठा बाळगणारे इसमावर कारवाई करुन एकुन 11,500/-रु चा मुद्देमाल केला जप्त "

### स्थानिक गुन्हे शाखेची कामगीरी

| पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम | रिपोर्ट देणाऱ्याचे नाव |
|---|---|---|
| **इतवारा** | गु.र.नं. 335/ 2025 कलम 4,25 शस्त्र अधिनियम 1959. | वि.रे.ह.घोगरे,स.पो.नि, स्थानिक गुन्हे शाखा,(खंडणी विरोधी पथक) नांदेड |

**गुन्हा उघडकीस आणणारे पोलीस अधिकारी व अंमलदार**

मा. श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड
मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक, भोकर
**यांचे मार्गदर्शनाखाली**
1) श्री. उदय खंडेराय, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड
2) श्री. वि.रे.ह.घोगरे, सहा. पोलीस निरीक्षक, (खंडणी विरोधी पथक) स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड
पोलीस अंमलदार राजु बोधगीरे, संतोष पावडे, विठठल वैद्य, गोविंद राठोड नेमणुक खंडणी विरोधी पथक, महेश बडगु नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड, पोलीस अंमलदार राजेंद्र सिटीकर, दिपक ओढणे, सायबर सेल नांदेड

**आरोपीचे नाव व पत्ता**

1. आदित्य दुर्गासिंह ठाकुर वय 20 वर्ष रा.गणेश टॉकीज रोड,लोहार गल्ली ता.जि.नांदेड

**थोडक्यात हकीकत**

मा.श्री.अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक ,नांदेड यांनी अवैध शस्त्र बाळगणारे इसमांवर कार्यवाही करणे कामी, पोलीस निरीक्षक उदय खंडेराय स्थानिक गुन्हे शाखा,नांदेड यांना आदेश दिले होते.

त्यावरुन पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा,नांदेड यांनी वि.रे.ह.घोगरे ,सपोनी स्थागुशा-खंडणी विरोधी पथक नांदेड यांना नांदेड शहरातील शस्त्र बाळगणारे इसमांवर कार्यवाही करणेबाबत आदेश दिल्याने सपोनि घोगरे हे त्यांचे पथकासह पेट्रोलींग करणे कामी व गोपनीय माहिती काढुन कार्यवाही कामी रवाना होवुन जुना मोंढा येथे गेले असता त्यांना गुप्त बातमीदारांमार्फत माहिती मिळाली कि, लोहार गल्ली येथील इसम नामे आदित्य ठाकुर याने त्याचे घरामध्ये अवैध शस्त्र साठा केला असल्याची गुप्त बातमीदारांमार्फत खात्रिशीर माहिती मिळाल्याने सपोनि घोगरे यांनी त्यांचे पथकासह मिळालेल्या माहितीप्रमाणे आदित्य ठाकुर हा राहत असलेले घरासमोर गणेश टॉकीज समोर लोहार गल्ली येथे जाऊन घराचे बाहेर थांबुन आवाज दिला असता आतुन एक पुरुष इसम बाहेर आला. त्यास त्याचे नाव गाव विचारता त्याने त्याचे नाव आदित्य दुर्गासिंह ठाकुर वय-20 वर्षे व्यवसाय-मजुरी रा.गणेश टॉकीझ रोड, लोहार गल्ली, नांदेड असे सांगीतल्याने त्यास घरझडतीचा उद्देश कळवुन पोलीस व पंचांची अंगझडती देऊन घराचे आत प्रवेश करुन पंचांसमक्ष पाहणी केली असता घराचे हॉलमध्ये सज्जावर एकुण 07 तलवारी कि.अं- 9500/-रुपये व तीन खंजर कि.अं-2000/- रुपये असा एकुण 11,500/- रुपयाचा अवैध शस्त्रसाठा मिळुन आल्याने इसम नामे आदित्य दुर्गासिंह ठाकुर वय-20 वर्षे व्यवसाय-मजुरी रा.गणेश टॉकीझ रोड, लोहार गल्ली, नांदेड याचे विरुध्द कलम 4/25 भारतीय हत्यार अधिनियम अन्वये पोलीस स्टेशन इतवारा येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे **मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड** यांनी कौतुक केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड**